**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसनशील देशांच्या मदतीसाठी वित्तीय यंत्रणा तयार करण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जी सेव्हन परिषदेत प्रतिपादन

- इराणसोबत युद्धबंदी करार अद्याप पूर्ण झालेला नाही, गरज पडली तर पुन्हा इराणवर हल्ला करू असा डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

- रेल्वेमंत्र्यांच्या हस्ते पुण्यात विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी, पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेचा प्रारंभ

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कुठल्याही बंडखोर गटाला मान्यता देऊ नये, अशी पक्षाची लोकसभेच्या सभापतींना विनंती

**आणि**

- लखनौ इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचं अफगाणिस्तानपुढं विजयासाठी ४०३ धावांचं आव्हान

**<><><><><>**

फ्रान्समधे एव्हियन इथं जी सेव्हन परिषदेत आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं भाषण झालं. “सर्वांच्या फायद्यासाठी समतोल, समावेशक आणि शाश्वत आर्थिक विकासाला प्रोत्साहन” या विषयावर बोलताना प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केलं, की विकसनशील देशांच्या मदतीसाठी वित्तीय यंत्रणा तयार करण्याची गरज आहे.

जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी प्रधानमंत्री मोदी यांची द्विपक्षीय चर्चा झाली. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण सामुग्री, माहिती तंत्रज्ञान आणि इतर संबंधित क्षेत्रांमधे उभयपक्षी संबंध दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांमधे सहमती झाली.

मोदी यांनी आज युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनिओ कोस्टा आणि युरोपियन परिषदेच्या अध्यक्ष उर्सुला वोन डेर लेएन यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा केली. भारत आणि युरोपियन युनियनमधल्या मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटीं हे ऐतिहासिक यश असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. भारत आणि युरोपियन युनियन सर्वसमावेशक धोरणात्मक अजेंडा हा दोन्ही बाजूंना लाभदायक ठरेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><>**

इराणसोबत युद्धबंदीसाठीचा सामंजस्य करार अद्याप पूर्ण झाला नाही, गरज पडली तर पुन्हा इराणवर हल्ला करू असा इशारा अमेरिके◌चे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. ते फ्रान्समधे जी सेव्हन परिषदेत बोलत होते. इराणसोबत शांतता कराराची घोषणा केल्यामुळे बाजारपेठेत सकारात्मक वातावरण आहे, होर्मुजची सामुद्रधुनी एक दोन दिवसांत पूर्णपणे खुली झाल्यामुळे इथून व्यापार सुरळीत सुरू होईल, असं ट्रम्प म्हणाले. मात्र गरज पडली तर इराणवर पुन्हा हल्ला करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**<><><><>**

पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून आणखी सहा नवीन फलाट उभारले जातील. असं रल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. पुणे रेल्वे स्थानकावर पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून रवाना केल्यावर, तसंच विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी केल्यानंतर ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ तसंच शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील कार्यक्रमाला उपस्थित होते.

जेएनपीटी आणि वाढवण या बंदरांपर्यंत विदर्भ आणि मराठवाड्याचा संपर्क मजबूत करण्यासाठी समर्पित मालवाहतूक लोहमार्ग मिळावा असा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मांडला आहे, त्यावर लौकरच काम सुरु करण्याचं आश्वासन वैष्णव यांनी दिलं. …

**होल्ड- बाईट- अश्विनी वैष्णव**

हडपसर रेल्वे स्थानकावरुन पुणे-हडपसर पाटना-दाणापूर या अमृत भारत एक्सप्रेसला वैष्णव यांनी हिरवी झेंडा दाखवला.

आज सकाळी वैष्णव यांचं पुणे विमानतळावर आगमन झालं. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांचं स्वागत केलं. राज्यात आकाशवाणीची यंत्रणा अधिक मजबूत करण्याचा केंद्रसरकारचा विचार असल्याचं यावेळी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पनवेल रेल्वे स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी भारतीय रेल्वेने राज्यात सोमाटणे-चिखली कॉर्ड लाईन प्रकल्पाला १७२ कोटी रुपये खर्चासह मंजुरी दिली आहे. हा नवीन रेल्वे मार्ग कर्जत मार्गावरच्या चिखली आणि रोहा मार्गावरच्या सोमाटणे यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरेल, असं रेल्वे मंत्रालयाने म्हटलं आहे.

हा प्रकल्प विशेषतः जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि ट्रस्टशी संबंधित मालवाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या शुक्रवारी नवी दिल्लीत प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या तब्बल २ हजार ४०० कोटी रुपयांचं प्रोत्साहन हप्ता वितरित केला जाणार आहे. हा कार्यक्रम केंद्र सरकारच्या रोजगारसंबंधी महत्त्वाच्या योजनेतला मोठा टप्पा असल्याचं प्रधानमंत्री कार्यालयानं म्हटलं आहे.

या योजनेद्वारे रोजगार निर्मितीला चालना देण्यात येत असून सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत असल्याचंही प्रधानमंत्री कार्यालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कुठल्याही बंडखोर गटाला मान्यता देऊ नये, अशी विनंती करणारं पत्र खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना लिहिलं आहे. प्रसार माध्यमांमधल्या वृत्तानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निवडणूक चिन्हावर निवडून आलेले काही खासदार स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी किंवा दुसऱ्या पक्षात विलीन होण्यासाठी लोकसभा कार्यालयाशी संपर्क साधत आहेत, असं अरविंद सावंत आपल्या पत्रात म्हणाले आहेत. राजकीय पक्षापासून स्वतंत्र असा कोणताही अधिकार विधिमंडळ पक्षाकडे नसतो. त्यामुळे पक्षाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या दाव्याचा कुठलाही प्रस्ताव आल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतीही अंमलबजावणी करू नये अशी विनंती खासदार अरविंद सावंत यांनी सभापती ओम बिर्ला यांना केली आहे. यासंदर्भात खासदार अनिल देसाई आणि अरविंद सावंत यांनी आज सभापती ओम बिरला यांची भेट घेतली. पक्षाच्या शिष्टमंडळाने बिर्ला यांना पक्षबदल विरोधी कायद्यातील तरतुदींविषयीचं निवेदन सादर केल्याचं खासदार अनिल देसाई यांनी भेटीनंतर बातमीदारांना सांगितलं.

**<><><><>**

एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज लखनौ इथं सुरु असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं अफगाणिस्तानपुढं विजयासाठी ४०३ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यावर, शुभमन गिल आणि इशान किशन यांच्या २२४ धावांच्या भागीदारीच्या

जोरावर भारतानं ४०२ धावा केल्या. शुभमन गिलनं १५४, तर इशान किशननं १२५ धावा केल्या. अफगाणिस्तानतर्फे नांगेयालिया खरोतेनं ४, तर रशीद खाननं ३ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा अफगाणिस्तानच्या ३१ व्या षटकात ५ बाद १७० धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि नेदरलँड्स यांच्यात यूकेमध्ये लीड्स इथं सामना सुरु आहे. नेदरलँड्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ षटकात १ बाद १३४ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

राज्यातल्या विधानपरिषदेच्या सतरा जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. सर्व मतदान केंद्रांवर तयारी पूर्ण झाली असून मतदान केंद्र अधिकाऱ्यांना निवडणूक साहित्याचं वितरण करण्यात आलं आहे.

**<><><><>**

अणुउर्जा विभागाचे सचिव डॉ अजित कुमार यांनी तारापूर अणुउर्जा स्थानकाला आज भेट दिली. जगातील सर्वात जुन्या असणाऱ्या TAPS 1 आणि TAPS 2 या अणुभट्यांच्या कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला. या दोन्ही अणुभट्ट्यांना नुकताच दहा वर्षाचा वाढीव कार्यकाळ मंजूर झाला आहे. या वाढीव कार्यकाळात अणुभट्ट्यांची सर्वसमावेशक तपासणी आणि कार्यक्षमतेचं मूल्यमापन करण्यासाठी स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर होणार असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**//<><><><><>//**